उपजिल्हा रूग्णालय, निलंगा, जि.लातूर हे रूग्णालय १०० खाटांचे उप जिल्हा रूग्णालय करण्याच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१७/ प्र.क्र.१०२/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख : २७ मार्च, २०१८.

वाचा :-१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३, दि.१७.०१.२०१३.

२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-६/ निलंगा १०० खाटाबांधकाम/१२३११-१२/१७, दि.१९.०७.२०१७.

३) मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेली दि. १५.०२.२०१८ रोजीची सचिव समितीची बैठक.

प्रस्तावना :-

निलंगा, जि. लातूर येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास उपरोक्त अनु. क्र. १ येथील दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन संदर्भाधिन अनु. क्र.२ येथील दि.१९.०७.२०१७ च्या पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा संचालनालयाने रु.१७७६.५९ लक्ष इतक्या रक्कमेचा अंदाजपत्रक व आराखडा प्रशासकीय मान्यतेकरीता सादर केला आहे. सदर अंदाजपत्रक उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम, पुणे यांनी तयार केलेल्या नकाशावर आधारित आहे. अंदाजपत्रकातील दर सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित आहे. सदर रू.१८२६.४२ लक्षचे अंदाजपत्रक व आराखड्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविली आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकांच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

निलंगा, जि. लातूर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या रू.१८२६.४२ लक्षच्या (अक्षरी रुपये एक हजार आठशे सव्वीस लक्ष बेचाळीस हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रक व आराखडयास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

दिनांक ०१.०७.२०१७ पासून भारत सरकारने वस्तु सेवाकर कायदा लागू केला असल्याने वस्तु व सेवा कराकरीता १२ टक्के तरतूद करण्यात आली आहे.

(अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच, विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

(ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

(क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

(इ) सदर कामाची किंमत रु.५.०० कोटी पेक्षा जास्त असून, सदर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीने दि.१५.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिली आहे.

(ई) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

२. सदर बांधकामांवरील खर्च खालील लेखाशीर्षांमधून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्र. एच-८</u>

४२१०-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१-	नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य)
११०-	रूग्णालये व दवाखाने
(१)(अ)-	पंचवार्षीक योजनांतर्गत योजना-इमारती
(००) (०१)-	मोठी बांधकामे (४२१० ००१४)
५३-	मोठी बांधकामे

३. सदर शासन निर्णय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीने दि.१५.०२.२०१८ रोजीच्या बैठकीन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१९१२०७१२३११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.27 13:00:44 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.

२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (लातूर मंडळ), लातूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर
८. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
१०. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (आरोग्य-३), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-४).

(शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.प्रशामा- २०१७/प्र.क्र.१०२/आरोग्य- ४, दि.२७.०३.२०१८ चे सहपत्र)

Name of the Department : PUBLIC HEALTH DEPTT.

Name of Work : Construction of 100 Bedded Rural Hospital at Sub District Hospital Premises at Nilanga Distt. Latur

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Items		Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)		Cost Rs.
(A)	**ESSENTIAL ITEMS**				
1	**Building proper (SCOPE)**				
	(a) Area (Sqmt.)	2527.05	21000	Per Sqmt.	5,30,68,050
	(b) Number of Floors	GF			
	(a) Area (Sqmt.)	2527.05	20000	Per Sqmt.	5,05,41,000
	(b) Number of Floors	FF			
	(a) Area (Sqmt.)	520.05	21000	Per Sqmt.	1,09,21,050
	(b) Number of Floors	SF			
	(c) Foundation in B.C../ Weak Soil				
	(d) Cost of Construction				**11,45,30,100**
2	**Electrification**	Internal	5 % of 1(d)		57,26,505
		External	6 % of 1(d)		68,71,806
				Total	**1,25,98,311**
3	**Water Supply and Sanitation**		5% - of 1(d)		**57,26,505**
4	**Miscellaneous Items**				
	Compound Wall with Gate	300	7000	Per Rmt.	21,00,000
	Internal Roads	100	5500	Per Rmt.	5,50,000
	Furniture	5574.15	2000	Per Sqmt.	1,11,48,300
	Fire Fighting Arrangements			Lump Sum	25,00,000
	C.C.Drains	200	5000	Per Rmt.	10,00,000
	Rain Water Harvesting			Lump Sum	15,00,000
	Garage	48	10000	Per Sqmt.	4,80,000
	Lifts			Lump Sum	25,00,000
	Soil Investigations			Lump Sum	2,00,000
	Flag Post			Lump Sum	3,00,000
	Land Development			Lump Sum	5,00,000
	Dismantalling existing strucutre			Lump Sum	10,00,000
		Sub Total	**(A) = (1)+(2)+(3)+(4)**		**15,39,83,216**
(B)	**OPTIONAL ITEMS**				
Sr.	**Items**				
1	Water Main,Storage, Pump House etc.			Lump Sum	5,00,000
2	Air Conditioning			Lump Sum	25,00,000
3	Solar Energy System			Lump Sum	15,00,000
4	Gardening & Landscapping			Lump Sum	5,00,000
			Subtotal (B)		**50,00,000**
			PROJECT (A) + (B)	**(T)**	**15,89,83,216**
			Add 4% for GST on (d)		**45,81,204**
			Add 12% for GST on (T)		**1,90,77,986**
			TOTAL COST OF PROJECT		**18,26,42,406**
			Say Rs. Lakhs		**1,826.42**